**संदर्भ** :- मा.आयुक्त सो. यांचे समवेत नगररचना विभागाचे अधिकारी यांची दिनांक ७/३/२०१८ रोजी संपन्न झालेली बैठक

नाशिक महानगरपालिका, नाशिक
जा.क्र.मनपा/नरवि/वशि/कार्यासन-८/४४७/२०१८
दिनांक :- १६/०३/२०१८

**परिपत्रक :**

नाशिक महानगरपालिकेची विकास योजना आणि विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली-२०१७ ही शासन अधिसुचना क्रमांक टिपीएस-१११६/सीआर.१४० (अ)/२०१६/नवि-९, दिनांक ९ जानेवारी २०१७ अन्वये मंजुर करण्यात आलेली असुन विकास योजनेमध्ये विविध प्रयोजनार्थ आरक्षित करण्यात आलेले क्षेत्र हे जमिन मालकांना हस्तांतरणीय विकास हक्काव्दारे मोबदला देऊन महानगरपालिकेच्या ताब्यात घेणे संदर्भात विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावलीतील नियम क्रमांक २२ मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

Ease of Services अंतर्गत हस्तांतरणीय विकास हक्काव्दारे जमिन संपादनाकरिता नगररचना विभागाकडे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर जलदगतीने निर्णय होऊन गतिमान प्रशासन या संकल्पने अंतर्गत TDR प्रस्ताव सादरीकरणाच्या कार्यपद्धतीमध्ये कमीत कमी स्तर ठेवणेबाबत दिनांक ७/३/२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मा.आयुक्त सो. यांनी निर्देश दिले आहेत. त्यानुसार हस्तांतरणीय विकास हक्क मंजुरीबाबत खालीलप्रमाणे कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र | कार्यवाहीचे स्वरुप | कालावधी |
|---|---|---|
| १. | अर्जाची तांत्रिक छाननी (उप अभियंता) | ७ दिवस |
| २. | जाहिर सुचना मनपा संकेत स्थळ तसेच वर्तमानपत्रात प्रसिद्धी (किमान ५ प्रकरणे एकावेळीस एकत्रितरित्या प्रसिद्धीस देणे.) परंतु साप्ताहात ५ प्रकरणे प्राप्त न झाल्यास जितकी प्रकरणे प्राप्त झाली आहेत तेवढी प्रकरणे प्रसिद्धीस देण्यात यावीत. | ७ दिवस |
| | अ) विधी विभागाचा अभिप्राय<br>ब) मिळकत विभागाचा अभिप्राय | जाहिर सुचना प्रसिद्धीनंतर दरम्यानच्या कालावधीत |
| ३. | जाहिर सुचनेनुसार हरकत प्राप्त झाल्यास स.सं.न.र व मिळकत व्यवस्थापक यांचेमार्फत संयुक्तरित्या हरकत सुनावणी | ७ दिवस |
| ४. | हरकत प्राप्त न झाल्यास सदर प्रस्ताव (इरादापत्रासह) मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेकरिता सादर करणे. | ३ दिवस |
| ५. | जमिनमालकाव्दारे जमिन महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन ७/१२/ Property Card सदरी महानगरपालिकेचे नाव लावल्यानंतर, जमिनीचे सिमांकन करणे (Stone Demarcation), महानगरपालिकेच्या मालकीबाबतचा फलक लावणे, जागा समतल केल्याबाबतचे फोटोग्राफ सादर करणे. | --<br>(जमिनमालकाने करावयाची कार्यवाही.) |
| ६. | महानगरपालिकेच्या नावे जमिन हस्तांतरीत केल्यानंतर त्याबाबतच्या नोंदी जसे की ७/१२/ Property Card उतारा व ६ ड नोंद (Geo Tagging सह) व इरादापत्रातील इतर पुर्तता महानगरपालिकेकडे सादर केल्यानंतर उप अभियंता डीआरसी सक्षम स्वाक्षरीकरिता सहायक संचालक नगररचना यांचेककडे सादर करणे. | ३ दिवस |

| अ.क्र | कार्यवाहीचे स्वरुप | कालावधी |
|---|---|---|
| ७. | सहायक संचालक, नगररचना यांनी मा.आयुक्तांचे स्वाक्षरीकरिता डीआरसी सादर करणे. | ३ दिवस |

वरीलप्रमाणे हस्तांतरणीय विकास हक्कांसंदर्भात प्राप्त होणाऱ्या प्रकरणांवर कार्यवाही करण्यात यावी. यामध्ये First Come First Serve याप्रमाणे प्रथम येणाऱ्याचे प्रकरण नियमानुसार प्राधान्याने निकाली काढण्यात यावे.

सदर आदेशाची दिनांक १६ /०३/२०१८ पासुन काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

(तुकाराम मुंढे)
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव**

१) सहायक संचालक, नगररचना, नाशिक महानगरपालिका
२) मिळकत व्यवस्थापक, नाशिक महानगरपालिका
३) सर्व उप अभियंता, नगररचना विभाग